
ePaper
तर मग मुंबईचे नावही छत्रपती शिवाजी महाराज नगर करा": खासदार इम्तियाज



वर्ष - 6 । अंक - 314 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज TM
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- देशात शिरूर मतदारसंघातील रस्ते वाहतुकीसाठी सर्वाधीक निधी
- सार्वजनिक तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी पुढाकार!
- सरकारचा दिलासा

www.mahaenews.com | बुधवार, दि. 1 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शहरातील जलतरण तलाव म्हणजे असून तोटा, नसून खोळंबा!

## »बहुतांश जलतरण तलाव बंद : महापालिका प्रशासनाची उदासीनता

।पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडसह परिसरात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने शहरातील नागरिकांची पावले पोहायला जाण्यासाठी जलतरण तलावाकडे वळत आहेत. मात्र पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शहराच्या विविध भागांतील १३ जलतरण तलावांपैकी केवळ सहा तलाव सुरू असून, सात तलाव बंद आहेत.त्यामुळे जलतरण तलाव म्हणजे असून तोटा अन् नसून खोळंबा अशी अवस्था झाली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने केशवनगर, संभाजीनगर, कासारवाडी, पिंपरी वाघेरे, यमुनानगर, पिंपळेगुरव, नेहरूनगर, चऱ्होली वडमुखवाडी, भोसरी, मोहननगर, थेरगाव, सांगवी आणि आकुर्डी या भागांत १३ जलतरण तलावांची उभारणी करण्यात आली आहे. त्यातील चिंचवड केशवनगर, संभाजीनगर, कासारवाडी, पिंपरीवाघेरे, यमुनानगर आणि पिंपळेगुरव हे जलतरण तलाव चालू आहेत. तर, भोसरी, मोहननगर, सांगवी, थेरगाव, आकुर्डी या भागातील जलतरण तलाव बंद आहेत. या तलावांची खोली कमी करणे आणि गळती रोखण्यासाठी स्थापत्य विषयक कामे सुरू आहेत. त्यासाठी आणखी काही महिने लागतील. त्यामुळे या भागातील नागरिकांना, खेळाडूंना खासगी जलतरण तलावावर जास्त पैसे मोजून पोहण्यासाठी जावे लागणार आहे.

नागरिकांमध्ये नाराजी... फेब्रुवारी महिना संपला असून तापमानातील तीव्रता वाढत आहे. उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. मार्चमध्ये उन्हाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. उन्हाळ्यात जलतरण तलावांमध्ये पोहायला येणाऱ्यांची संख्या मोठी असते.

महापालिकेच्या जलतरण तलावावर एक तास पोहण्यासाठी दहा रुपये शुल्क आकारण्यात येते. तसेच वयोगटानुसार तिमाहीसाठी २०० रुपये, सहामाहीसाठी ३५०, तर वार्षिक ५०० रुपयांपर्यंतचे पास देण्यात येतात. त्यामुळे महापालिकेच्या तलावावर उन्हाळ्यात प्रचंड मोठी गर्दी असते. महापालिकेच्या अयोग्य नियोजनामुळे उन्हाळा सुरू होऊनही सात जलतरण तलाव बंद आहेत. त्यामुळे खेळाडू, नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

### आठवड्याभरात सुरु करू : प्रशासनाची भूमिका

» शहराच्या विविध भागांत महापालिकेच्या वतीने १३ जलतरण तलाव उभारले आहेत. यापैकी सद्यस्थितीत सहा तलाव सुरू आहेत. वडमुखवाडी येथील जलतरण तलाव नवीन असल्याने विविध अडचणी येत आहेत. पाणी १५ लाख लीटर लागत आहे. पाणी भरले असून गळती रोखण्यासाठीचे कामकाज सुरू आहे. त्यामुळे आठवड्याभरात हा तलाव सुरू होईल. तर, नेहरुनगर येथील जलतरण तलाव पुढील दोन दिवसांत चालू करण्यात येईल. ऑनलाइन आरक्षण दिले जात आहे. पासची सुविधाही ऑनलाइन केली जाणार आहे. मानवी हस्तक्षेप ठेवण्यात येणार नाही.



“ प्रत्येक तलावावर एकावेळी ८० जणांची बॅच करण्याचे नियोजन आहे. महापालिकेच्या HTTPS://WWW.PCMCINDIA.GOV.IN या संकेतस्थळाच्या मुख्य पृष्ठावर जलतरण तलाव ऑनलाइन नोंदणीची ‘लिंक’ देण्यात आली आहे. या लिंकवर क्लिक केल्यानंतर माहिती भरून आरक्षण करता येईल.

- बाळासाहेब खांडेकर,
सहाय्यक आयुक्त, क्रीडा विभाग.

### देशात शिरूर मतदारसंघातील
# रस्ते वाहतुकीसाठी सर्वाधिक निधी
## » खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केल्या भावना

।हडपसर । महाईन्यूज ।

**मुलूख मारायचा असेल तर गड सांभाळणारी माणसे महत्वाची असतात. आपल्या सारखे कार्यकर्ते ती भूमिका निभावत असल्यामुळेच मला संसदेत मतदारसंघाचे प्रतिनिधित्व चांगल्याप्रकारे करता येत आहे. त्याची पावती म्हणून मला दुसऱ्यांदा संसदरत्न पुरस्कार मिळू शकला आहे, अशी भावना खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केली.**

खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना दुसऱ्यांदा संसदरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल हडपसर विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश घुले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात आपल्या भावना व्यक्त करताना खासदार डॉ. कोल्हे बोलत होते.

खासदार डॉ. कोल्हे म्हणाले, "आज देशातील सर्वच लोकसभा मतदारसंघापैकी रस्ते वाहतुकीसाठी सर्वाधीक बावीस हजार कोटी रूपयांचा निधी मिळणारा केवळ शिरूर मतदारसंघ आहे. पुणे ते नगर, नाशिक महामार्ग, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे आदी मोठे प्रकल्प मार्गी लागला आहेत.



### कार्यकर्त्यांनी त्यांच्या कामातून प्रेरणा

**»राज्यातील सरकार लोकहिताच्या कामांकडे दुर्लक्ष करीत आहे. राजकीय व्यक्तींसह सर्वसामान्य माणसालाही वेठीस धरीत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले जात नाही.' सुरेश घुले म्हणाले, "पंतप्रधानांनी कौतुक करावे इतके अभ्यासू संसद प्रतिनिधी आपल्याला लाभले आहेत. मतदारसंघातील अनेक मोठ्या प्रकल्पांना त्यांच्यामुळे गती मिळाली आहे. कार्यकर्त्यांनी त्यांच्या कामातून प्रेरणा घ्यावी.'**

राज्यातील सरकार लोकहिताच्या कामांकडे दुर्लक्ष करीत आहे. राजकीय व्यक्तींसह सर्वसामान्य माणसालाही वेठीस धरीत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले जात नाही.' सुरेश घुले म्हणाले, "पंतप्रधानांनी कौतुक करावे इतके अभ्यासू संसद प्रतिनिधी आपल्याला लाभले आहेत. मतदारसंघातील अनेक मोठ्या प्रकल्पांना त्यांच्यामुळे गती मिळाली आहे.

कार्यकर्त्यांनी त्यांच्या कामातून प्रेरणा घ्यावी.'

पक्षाचे मतदार संघाचे निरीक्षक एडवोकेट औदुंबर खुणे पाटील, माजी महापौर वैशाली बनकर, माजी उपमहापौर निलेश मगर, प्रदेश सरचिटणीस अजित घुले, माजी नगरसेवक फारूक इनामदार, योगेश ससाणे, अशोक कांबळे, सुनील बनकर, शिवाजी पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप घुले, जितीन कांबळे, सुरेश घुले,

डॉ. सुहास लांडे, डॉ. लालासाहेब गायकवाड, प्रशांत घुले, शिवाजी खलसे, राजेंद्र गारूडकर, वासंती काकडे, पूनम पाटील, सागर भोसले, संजीवनी जाधव, रोहिणी तुपे, सविता मोरे, प्रतिमा तुपे, दिपाली कवडे, शीतल शिंदे, वैष्णवी सातव, स्वाती चिटणीस, निलेश घुले, राहुल घुले, विक्रम जाधव, रुपेश तुपे, कलेश्वर घुले, मंगेश मोरे आदी यावेळी उपस्थित होते. मतदारसंघाचे अध्यक्ष डॉ. शंतनू जगदाळे, कार्याध्यक्ष अमर तुपे, सेवादल अध्यक्ष योगेश जगताप यांनी संयोजन केले.

# प्रस्तावित वीज दरवाढ मागे न घेतल्यास आंदोलन
## » बारामती इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचा इशारा

।बारामती । महाईन्यूज । प्रतिनिधी।



महावितरणने महाराष्ट्र राज्य विद्युत नियमक मंडळाकडे जवळपास ३७ टक्के वीज दरवाढ करण्यासाठी परवानगी मागितली आहे. मुळातच महाराष्ट्राचे वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असून, पुन्हा दरवाढ लादल्यास महाराष्ट्रातील उद्योग प्रचंड आर्थिक अडचणीत येतील. शासनाने संभाव्य वीजदरवाढ त्वरित मागे न घेतल्यास महाराष्ट्रातील उद्योजक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा बारामती इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार यांनी दिला.

महावितरणच्या दरवाढीच्या प्रस्तावाची होळी करून बारामतीतील उद्योजकांनी ऊर्जा भवन येथे निषेध व्यक्त केला. त्याप्रसंगी जामदार बोलत होते. असोसिएशनचे सचिव अनंत अवचट, संभाजी माने, अंबीरशाह शेख, महादेव गायकवाड, हरीश कुंभरकर, मनोहर गावडे, चंद्रकांत नलवडे, संदीप जगताप, हरीश खाडे, नितीन जामदार, राजन नायर, जीटीएन कंपनीचे उद्धव मिश्रा, संतोष कणसे, विजय झांबरे, रघुनाथ दाभाडे, अमोल रणशिंग या वेळी उपस्थित होते.

जामदार म्हणाले, राज्याराज्यातील उद्योगांमधील तीव्र स्पर्धा असताना महाराष्ट्रातील वीज दर कळीचा मुद्दा ठरत आहे. अशातच पुन्हा वीज दरवाढ केली तर महाराष्ट्रातील उद्योग व्यवसायिक स्पर्धेतून बाहेर फेकले जातील याची चिंता वाटत आहे. बारामतीसह राज्यातील मोठे प्रकल्प अवाजवी वीज दरामुळे बंद पडण्याच्या मार्गावर असून, लहान मोठे उद्योग परराज्यात स्थलांतर करण्याच्या विचारात आहेत. दरवाढीविरोधात उद्योजकांचे निवेदन राज्य सरकार आणि महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात येईल, असे आश्वासन कार्यकारी अभियंता गणेश लटपटे यांनी असोसिएशनच्या शिष्टमंडळाला दिले.


# मतपेट्यांच्या सुरक्षिततेसाठी 'सीआयएसएफ'च्या जवानांचा पहारा
## » पोलिसांचा खडा पहारा लावण्यात आला असून, गुरुवारी मतमोजणी होणार

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील मतपेट्या थेरगाव येथील शंकरराव गावडे कामगार भवन येथे ठेवण्यात आल्या आहेत. या ठिकाणी मतपेट्यांसाठी स्ट्रॉंग रूम बनविण्यात आली. मतपेट्यांच्या सुरक्षिततेसाठी या परिसरात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ) आणि स्थानिक पोलिसांचा खडा पहारा लावण्यात आला असून, गुरुवारी मतमोजणी होणार आहे.**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी रविवारी मतदान प्रक्रिया पार पडली. ५०.४७ टक्के मतदान झाले. मतदान झाल्यानंतर शंकरराव गावडे कामगार भवन येथे सर्व मतपेट्या ठेवण्यात आल्या. येथील स्ट्रॉंग रूम सील करण्यात आली. २ मार्च रोजी या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

स्ट्रॉंग रूमच्या सुरक्षेसाठी सीआयएसएफचे ९० जवान, स्थानिक पोलिसांचे दोन पोलीस निरीक्षक, दोन पोलीस उपनिरीक्षक आणि २० अंमलदार यांचा खडा पहारा ठेवण्यात आला आहे.स्ट्रॉंग रूम असलेल्या परिसरात चार मनोरे उभारण्यात आले आहेत.तेथून स्ट्रॉंग



रूम आणि परिसरावर निगराणी ठेवली जात आहे. रात्रीच्या वेळी पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त दर दोन तासांनी स्ट्रॉंग

### अंमलदार यांचा खडा पहारा

**»स्ट्रॉंग रूमच्या सुरक्षेसाठी सीआयएसएफचे ९० जवान, स्थानिक पोलिसांचे दोन पोलीस निरीक्षक, दोन पोलीस उपनिरीक्षक आणि २० अंमलदार यांचा खडा पहारा ठेवण्यात आला आहे.स्ट्रॉंग रूम असलेल्या परिसरात चार मनोरे उभारण्यात आले आहेत. तेथून स्ट्रॉंग रूम आणि परिसरावर निगराणी ठेवली जात आहे. रात्रीच्या वेळी पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त दर दोन तासांनी स्ट्रॉंग रूमला भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेत आहेत.**

रूमला भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेत आहेत. मतमोजणीच्या दिवशी प्रत्येक पक्षाला स्वतंत्र व्यवस्था करण्याचे पोलिसांचे नियोजन सुरु आहे. मतमोजणीनंतर कोणतलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी संपूर्ण मतदारसंघात बंदोबस्त लावला जाणार आहे. निवडणूक काळात निवडणुकीच्या अनुषंगाने घडलेल्या अनुचित प्रकारांच्या घटनास्थळी देखील मतमोजणीच्या दिवशी चोख बंदोबस्त पुरवला जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# सार्वजनिक तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी पुढाकार!

## »आमदार महेश लांडगे : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना सूचना

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक तलावांचे खोलीकरण आणि पुनरुज्जीवन करण्याबाबत महापालिका प्रशासनाने पुढाकार घ्यावा. त्याद्वारे पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक जलस्त्रोतांचे जतन करावे, अशा सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.**

याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, वाढत्या नागरीकरणामुळे पिंपरी-चिंचवड शहराचे सौंदर्य असलेल्या तलावांची दुरावस्था झाली आहे. सर्वच तलावांमध्ये मोठ्याप्रमाणात गाळ साचला असून, गवत आणि जलपर्णीचे साम्राज्य आहे. काही ठिकाणी कचरा फेकण्यात आला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्यस्थितीला शहरात प्राधिकरण येथील गणेश तलाव, चिखली, भोसरी आणि बर्ड व्हॅली येथील तलावाची अवस्था दयनीय आहे. गेल्या काही वर्षापासून या तलावांमधील गाळ काढण्यात आलेला नाही. तलावांमध्ये प्रशासनाकडून नियमित स्वच्छता केली जात नाही. अस्वच्छतेमुळे तलावातील पाण्याचे प्रदूषण मोठ्याप्रमाणात वाढले आहे. यामुळे प्रशासनाने गांभीर्याने उपाययोजना करण्याची अपेक्षा आहे.

### तलाव सुधार प्रकल्प हाती घ्यावा : लांडगे

»शहरातील तलाव हे पर्यटनस्थळ म्हणून विकसित झाले पाहिजेत, असा आमचा आग्रह आहे. त्याकरिता तलावांमधील गाळ काढून खोलीकरण करावे. त्याद्वारे तलावांचे पुनरुज्जीवन करुन सुशोभीकरण करावे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना या ठिकाणी मोकळा श्वास घेता येईल.

»पर्यावरण संधर्वन आणि नैसर्गिक जलस्त्रोत पुनरुज्जीवन करतानाच शहराच्या सौंदर्यात भर घालल्याच्या हेतूने तलाव सुधार प्रकल्प हाती घेणे संयुक्तिक ठरणार आहे. यावर सकारात्मक भूमिकेतून कार्यवाही करावी, अशी सूचनाही आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.



## 'आप'चे पिंपरी-चिंचवडचे कार्याध्यक्ष चेतन बेंद्रे यांचे निलंबन रद्द

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



आम आदमी पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहर कार्याध्यक्ष चेतन बेंद्रे यांच्यावरील निलंबनाची कारवाई पक्षाने रद्द केली आहे. याबाबतची माहिती आपचे राज्य प्रभारी हरिभाऊ राठोड यांनी दिली.

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील 'आप'चे अधिकृत उमेदवार मनोहर पाटील यांचा उमेदवारी अर्ज बाद झाला होता. हा प्रकार जाणीवपूर्वक करण्यात आल्याचा ठपका ठेवत चेतन बेंद्रे यांना एक वर्षासाठी लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम गेली काही वर्षे ते निगडी, आकुर्डी भागात करत आहेत. पक्षासाठी केलेल्या कामाचा विचार करत बेंद्रे यांचे निलंबन रद्द करण्यात आले आहे.

## देहूमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

**देहू** - येथील अभंग इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात झाले. 'माझा महाराष्ट्र...माझा अभिमान' या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक विविधता आपल्या बहारदार नृत्य शैलीतून सादर केली. पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांनी भूपाळी, वासुदेव पासून शेतकरी, आदिवासी, कोळी, गोंधळ, मंगळागौर, पालखी सोहळ्याची परंपरा जोपासत दहीहंडी, गणेशोत्सव, होळी, गुढीपाडवा या मराठमोळ्या सणांचा नृत्यातून सादरी करण्यात आले.

शिवराज्याभिषेक सोहळा सादर करण्यात आला. प्रा. विकास कंद यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. कविता अय्यर, एन. बी. जाधव, बी. एस. पठारे, नगराध्यक्षा स्मिता चव्हाण, राजाभाऊ गोलांडे, दत्तात्रेय अत्रे उपस्थित होते. वैभवी डोळस व आराध्य माने यांनी सूत्रसंचालन केले. अथर्व माने याने आभार मानले.

# शाळांच्या कागदपत्रांची होणार तपासणी

## » शिक्षण विभाग सतर्क : संबंधितांवर कारवाई करणार

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बोगस परवाने घेणा-या शाळांचे बिंग फुटल्यानंतर महापालिकेतील शिक्षण विभागाकडून शहरातील इंग्रजी माध्यमाच्या सर्व शिक्षण संस्थाचालकांकडून सर्व आवश्यक कागदपत्रे मागविण्यात आली आहेत. ४२ सीबीएसई शाळांनी कागदपत्रांची फाइल्स जमा केल्या असून त्याची चौकशी करण्यासाठी शिक्षण विभागाकडून या फाइल्स राज्याच्या शिक्षण उपसंचालक यांच्याकडे पाठविल्या आहेत. तपासणीत बोगस कागदपत्रे आढळल्यास संबंधित शाळेवर कडक कारवाई केली जाणार आहे.**

पिंपरी-चिंचवडमध्ये इंग्रजी माध्यमाची (सीबीएसई) एक आणि पुण्यात दोन शाळा बोगस प्रमाणपत्राच्या आधारे चालविल्या जात असल्याची माहिती उजेडात आली होती.

या पार्श्वभूमीवर राज्याच्या शिक्षण विभागाकडून शहरातील सर्व सीबीएसई बोर्डाच्या शाळा प्रमाणपत्रांच्या फाइल्स संकलित करण्याचे आदेश पिंपरी-चिंचवड महापालिकेतील शिक्षण विभागाला दिले होते. त्यानुसार सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळांची माहिती संकलित करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली.




दहा दिवसांत तब्बल ४२ शाळांची कागदोपत्री माहिती गोळा करण्यात आली.

या फाइल्स राज्याचे शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तपासण्यासाठी पाठविण्यात आले आहेत. शाळा सुरू करताना संबंधित संस्थाचालकाने राज्य शासनाचे प्रमाणपत्र घेण्यासाठी जी कागदपत्रे सरकारकडे जमा केली होती.

ती कागदपत्रे आणि नुकत्या संकलित केलेल्या फाइल्सची एकत्रित तपासणी केली जाणार आहे. तपासणीत तफावत अथवा बोगस कागदपत्रे आढळून आल्यास संबंधित शाळेवर कारवाई केली जाणार आहे. कदाचित त्या शाळेचा परवाना देखील रद्द केला जाऊ शकतो.

### आदेशाची होतेय पायमल्ली...

**»बोगस प्रमाणपत्रांची माहिती समोर आल्यानंतर सीबीएसई बोर्डाच्या सर्व शाळांना परवानगी प्रमाणपत्र शाळेच्या प्रवेशद्वारावर लावण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. सर्व शिक्षण संस्थांना तसे आदेश देण्यात आले होते. मात्र, आज घडीला काही शाळांनी प्रवेशद्वारावर परवानगी प्रमाणपत्र लावल्याचे दिसत नाही. त्यामुळे पालकांच्या मनामध्ये पुन्हा बोगस शाळेबाबत संशय निर्माण झाला आहे. तर, दुसरीकडे शिक्षण विभागाने आदेश काढून देखील शाळा व्यवस्थापनाकडून त्याचे पालन केले जात नाही.**

## संपादकीय »

# ‘आनंदाचा शिधा’ मिळतो कधी कधी!

***दिवाळीप्रमाणेच शिंदे-फडणवीस सरकारने गुढीपाडवा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे निमित्त साधून राज्यातील सुमारे दीड कोटी जनतेला ‘आनंदाचा शिधा’ वाटप करण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला. या निर्णयानुसार शिधापत्रिकाधारकांना अवघ्या 100 रुपयांमध्ये १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर पामतेल देण्यात येणार आहे.***

दिवाळीप्रमाणेच शिंदे-फडणवीस सरकारने गुढीपाडवा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे निमित्त साधून राज्यातील सुमारे दीड कोटी जनतेला ‘आनंदाचा शिधा’ वाटप करण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला. या निर्णयानुसार शिधापत्रिकाधारकांना अवघ्या 100 रुपयांमध्ये १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर पामतेल देण्यात येणार आहे. गेल्या वर्षी दिवाळीत सरकारने मोठा गाजावाजा करून गोरगरिबांसाठी दिवाळीत स्वस्तात आनंदाचा शिधा वाटप करण्याची घोषणा केली होती. ही योजना चांगली असल्याने सुरुवातीला अनेकांनी या योजनेचे स्वागत केले, मात्र राज्यकर्त्यांच्या नियोजनाच्या अभावी अनेक भागांतील जनतेपर्यंत दिवाळी संपून गेली तरी आनंदाचा शिधा पोहोचलाच नव्हता. त्यामुळे दिवाळी गोड व्हायच्या ऐवजी सरकारवर टीका करून अनेकांचे तोंड मात्र कडू झाले होते. त्याची पुनरावृत्ती यावेळी होऊ नये याची दक्षता यावेळी राज्यकर्त्यांनी घ्यायला हवी. राज्यातील सत्ताबदलानंतर शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आले. तेव्हापासून या सरकारकडून सातत्याने लोकप्रिय घोषणा आणि निर्णयांचा धडाका सुरू आहे. सत्तेत येताच सर्वप्रथम या सरकारने पेट्रोल-डिझेलवरील मूल्यवर्धीत कर कमी करून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचे मोठे काम केले. लगोलग सीएनजी आणि स्वयंपाकाच्या गॅसचे दर सातत्याने वाढवून केंद्राने दुसऱ्या बाजूने त्याची भरपाई केली हा भाग अलाहिदा. परंतु शिंदे-फडणवीस सरकारने धाडसाने अनेक निर्णय घेतले. यामध्ये राज्य सरकारी सेवेत 75 हजार पदांची भरती, अतिवृष्टीने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना 4,700 कोटींची मदत, धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर बोनस म्हणून देणे, राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 1100 कोटींच्या अनुदानाला मंजुरी, अंगणवाडी सेविकांच्या भरतीसोबत मानधनात दुप्पट वाढीचा निर्णय, अशा एक ना अनेक धडाकेबाज निर्णयांचा यात समावेश आहे.

# वस्त्या उभ्या राहतायत... सुरक्षा, सुविधांची बोंब!

मुंबईचे जुळे शहर असलेल्या नवी मुंबईचा विस्तार इतका झपाट्याने झाला की आता तिसरी मुंबई पनवेलपासून पुढे होऊ घातली आहे. ठिकठिकाणी गगनचुंबी इमारती उभ्या राहत आहेत. बऱ्याच इमारतींतून कुटुंबे राहण्याससुद्धा आली आहेत. आधुनिक सुखसुविधा तेथे निर्माण करण्यात आल्या आहेत. अंतर्गत अग्निरोधक यंत्रणाही आहेत, पण आगीचा बिकट प्रसंग निर्माण झाला तर या यंत्रणा त्याला तोंड देण्यासाठी सक्षम ठरतील काय, इमारतीत अडकलेल्यांची सुटका कशी आणि कोण करणार, असा सवाल काही जाणकार वारंवार व्यक्त करू लागले आहेत.

अलीकडे एक मुद्दा विशेष चर्चेत येत आहे आणि तो म्हणजे आकाशाला गवसणी घालणाऱ्या इमारती दिमाखात उभ्या राहत असताना त्यांच्या सुरक्षेचे काय? नव्या वस्त्यांचे काय? अग्निशमन यंत्रणा, आजूबाजूचा परिसर आदी विषय या पार्श्वभूमीवर विशेषत्वाने अधोरेखीत होत असतात. बांधकामांचा दर्जा काहीवेळेला आसपासच्या वस्तीचे ‘टेन्शन’ वाढवत असतो. विशेषतः आगीसारख्या घटना घडतात तेव्हा इमारतींची उंची आणि त्या अनुषंगाने इतर विषयांची चर्चा होते. मुंबई किंवा अन्य महानगरांमध्ये किमान अग्निशमन यंत्रणा सुसज्ज आहे, परंतु नवीन शहरे, वस्त्या वसत असताना तेथे उभ्या राहणाऱ्या उंच



इमारतींमधून आगीसारख्या घटना घडल्यास सार्वजनिक अग्निशमन यंत्रणेची वानवा आहे.

त्यांना महानगरातील अग्निशमन यंत्रणेवर अवलंबून रहावे लागते. या इमारतींमूधन आग प्रतिरोधक यंत्रणा उभारलेली असते, परंतु भीषण आगीच्या वेळी या यंत्रणा फोल ठरल्याची अनेक उदाहरणे आहेत. (गेल्या आठवड्यात दादर येथे घडलेली आगीची घटना या दृष्टीने बोलकी आहे.) त्यामुळे अशा टोलेजंग इमारती उभ्या राहण्यापूर्वी सार्वजनिक अग्निशमन यंत्रणा किमान काही अंतरावर बंधनकारक असायला पाहिजेत. इमारत बांधकाम क्षेत्रात बडे बिल्डर असल्याने त्यांना सर्व परवानग्या आरामात मिळतात, परंतु प्रत्येक परवानगी देताना इमारतीमधील रहिवाशांची काळजी अग्रक्रमाने घेतली पाहिजे.

मुंबईचे जुळे शहर असलेल्या नवी मुंबईचा विस्तार इतका झपाट्याने झाला की आता तिसरी मुंबई पनवेलपासून पुढे होऊ घातली आहे. ठिकठिकाणी गगनचुंबी इमारती उभ्या राहत आहेत. बऱ्याच इमारतींतून कुटुंबे राहण्याससुद्धा आली आहेत. आधुनिक सुखसुविधा तेथे निर्माण करण्यात आल्या आहेत. अंतर्गत अग्निरोधक यंत्रणाही आहेत, पण आगीचा बिकट प्रसंग निर्माण झाला तर या यंत्रणा त्याला तोंड देण्यासाठी सक्षम ठरतील काय, इमारतीत अडकलेल्यांची सुटका कशी आणि कोण करणार, असा सवाल काही जाणकार वारंवार व्यक्त करू लागले आहेत. महापालिकेची अग्निशमन यंत्रणा कुठे-कुठे पुरी पडणार, हा प्रश्नच आहे. आगीसारख्या घटना या काही सांगून होत नाहीत. गॅस सिलिंडरचा स्फोट, शॉर्टसर्किट, फटाके फोडताना दाखविण्यात येणारा निष्काळजीपणा अशी एक ना अनेक कारणे आग लागण्यामागे आहेत. गगनचुंबी किंवा उत्तुंग इमारती उभ्या राहत असताना शेवटच्या मजल्यापर्यंत पोहचणारी शिडी उपलब्ध नाही.

मुंबईत उत्तुंग इमारतींमध्ये आगीची घटना घडते तेव्हा अग्निशमन यंत्रणेची किती तारांबळ उडते हे पाहण्यात आले आहे. त्यानंतर ट्रटींवर चर्चा होतात. पुढे त्या केवळ ‘चर्चा’च असल्याचे लक्षात येते, परंतु यापुढे तसे होता कामा नये. शहरीकरणाचा वाढता वेग लक्षात घेता जागोजागी सुसज्ज अग्निशमन यंत्रणा उभारली पाहिजे, नव्हे ती काळाची गरज ठरली आहे. तहान लागली की विहीर खणायची सवय आपल्याकडे असल्याने आवश्यक ती यंत्रणा वेळीच उभारण्याची गरज आहे. पाच मजल्यांपासून अधिक उंच इमारती निम्न शहरी भागातच नव्हे, तर ग्रामीण भागातही बांधल्या गेल्या आहेत, अनेक ठिकाणी तशी बांधकामे सुरू आहेत. या ठिकाणी एक लक्षात येते की अग्निशमन यंत्रणेबाबत कोणतीही काळजी घेण्यात आलेली नाही. नगरपालिकांकडे असलेल्या या यंत्रणांना मर्यादा आहेत. ग्रामपंचायतींकडे अशी यंत्रणा असण्याचा प्रश्न येत नाही. वर-वर साधी वाटणारी ही बाब गंभीर चिंता उत्पन्न करणारी ठरू शकते किंबहुना तशा घटना घडलेल्या आहेत.

इमारतींचे जाळे पसरत असताना (हवं तर त्याला सिमेंटची जंगलं म्हणूयात) अशा कितीतरी जागा दाखविता येतील की तेथे धड रस्ते नाहीत. अरुंद बोळ वाटावेत असे रस्ते आहेत. एखादी आगीची घटना घडली तर बंब त्वरित तेथे पोहचेल अशी परिस्थिती नाही. यावरही अनेकदा ओरड झाली आहे. जागा मोक्याची असेल तेथे उंच इमारती बांधण्याचा सपाटा लावण्यात आला आहे. वर्दळीचे रस्ते अतिक्रमणासाठीच असतात असा कित्येकांचा ठाम समज झालेला आहे.

**जुन्या कांद्याची आवक अद्याप संपली नसताना बाजारात नवीन कांद्याची आवक सुरू झाली आहे. आवकेच्या तुलनेत मागणी होत नसल्याने महिन्यापासून दरामध्ये रोज घट होत आहे. घटलेल्या दरामुळे कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. दरात अशीच घट सुरू राहिल्यास खर्चही निघणे अवघड होईल, अशी भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. याच पार्श्वभूमीवर नाशिकच्या शेतकऱ्याने मुख्यमंत्र्यांना रक्ताने पत्र लिहीत कांद्याच्या अग्निडाग कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले.**

# कांद्याला नव्हे उदासीनतेला द्यावा अग्निडाग



अशी पत्रिका तयार करण्यामागची शेतकऱ्याची हतबलता सरकार समजून घ्यायला तयार नाही. शेतकऱ्यांनी बाजार समित्यांमध्ये लिलाव संपूर्णपणे बंद पाडलेले होते. त्यानंतरही कुठल्याही स्वरूपाची दखल सरकारने घेतली नाही. दरवर्षी नवीन लाल कांद्याचा हंगाम सुमारे ऑक्टोबर ते नोव्हेंबरदरम्यान सुरू होतो.

यंदा अतिपावसामुळे कांद्याची लागवड करण्यात अडथळा निर्माण झाला होता. परिणामी लागवड लांबल्याने यंदाचा नवीन कांद्याचा हंगाम उशिराने सुरू झाला आहे. त्यात जुन्या कांद्याची अद्यापही आवक सुरूच आहे. परराज्यातून कांद्याला होणारी मागणी थांबली आहे. या सर्व कारणांमुळे बाजारात विक्रीला आलेला कांदा मागणीअभावी शिल्लक राहत आहे. त्यामुळे दरात घसरण सुरू झाली आहे. कांद्याचा हंगाम एक ते दीड महिना लांबणीवर पडला. डिसेंबर महिन्यात नवीन लाल कांद्याचा हंगाम सुरू झाला. त्यावेळी बाजारात जुन्या कांद्याचा मुबलक साठा होता. त्यामुळे नवीन लाल कांद्याला दर मिळाला नाही. बाजारात लाल कांद्याची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे. आता उन्हाळ कांद्याची (हळवी) आवक सुरू होईल. आवकेच्या तुलनेत कांद्याला मागणीही नाही. सद्यस्थितीत बाजारात कांदा मुबलक प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्यामुळे येत्या काळात कांद्याच्या दरात वाढ होण्याची शक्यता कमीच आहे.

लागवडीखालील वाढलेले क्षेत्र, गरजेपेक्षा जास्त उत्पादन, निर्यातीच्या मर्यादा, साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा, सरकारकडे नसलेले ठोस धोरण यामुळे आज कांदा उत्पादकांना रडवतो आहे. सरकार व शेतकऱ्यांनी वेळीच कांदाप्रश्न समजून घेतला नाही, तर त्याचा फटका दोघांना कायमच बसत राहणार आहे. उत्पादन, पुरवठा आणि दर यासंदर्भातील गृहितकांच्या पलीकडे जाऊन काही बाबींवर ठोस उपाय योजण्यास सरकार का धजावत नाही, हा प्रश्न तितकाच गंभीर आहे. शेतकऱ्यापेक्षा वरचढ असणारी दलालांची साखळी, बाजारपेठेतील सदोष व्यवस्था, रस्ते, साठवणूक, व्यवस्थापन, पायाभूत सुविधांचा अभाव, कृषी उत्पादनाचा नेमका अंदाज घेण्यात कुचकामी ठरणारी यंत्रणा, निर्यात धोरण आणि शेतकऱ्यांचे बाजाराविषयीचे अज्ञान, किमान हमीभाव, उत्पादनाचे विकेंद्रीकरण यामध्ये शेतकऱ्यांच्या समस्यांचे मूळ दडले आहे. कोणत्याही व्यवसायात नफेखोरीला कायद्याने मर्यादा घालून दिल्या आहेत. सरकारने याविषयीचे अधिकार राखून ठेवले आहेत, मात्र ही यंत्रणा जेव्हा व्यापाऱ्यांच्या हातचे बाहुले बनते तेव्हा ग्राहक हिताचे व शेतकऱ्यांना न्याय देणारे नियम, संकेत, कायदे असूनही साठेबाजी व नफेखोरी हाच व्यवसाय बनतो. नेमके हेच घडत आहे.

कांदा उत्पादनात देशात महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. महाराष्ट्रात देशातील ३० टक्क्यांपेक्षा जास्त कांदा पिकवला जातो. कॅश क्रॉप म्हणून या पिकाकडे पाहिले जात असल्याने इतर राज्येही कांद्याचे उत्पादन घेऊ लागली आहेत. गेल्या दशकापर्यंत देशात फक्त आठ राज्यांत कांदा पिकत होता, मात्र कांद्याला मिळणारा दर आणि तीन महिन्यांत आणि कमी पाण्यात उत्पन्न देणारे नगदी पीक म्हणून कांदा लागवडीकडे इतर राज्यातील शेतकरीही वळू लागले आहेत. आज देशात जवळपास २६ राज्यांमध्ये कांदा पिकू लागला आहे.

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला 'महाईन्यूज'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अंगणवाडी कर्मचाऱ्याच्या मानधनात दीड हजार रुपये वाढ

# सरकारचा दिलासा!

## बैठकीत तोडगा काढण्यात सरकारला यश

। मुंबई । महाईन्यूज ।

**राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या आंदोलनाला यश आले असून, मानधनात दीड हजार रुपये वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आपल्या विविध मुंबईतल्या आझाद मैदानावर अंगणवाडी सेविकांनी ठिय्या आंदोलनाचे हत्यार उपसले होते. तर, काही अंगणवाडी सेविका थेट रायगड किल्ल्यावर पोहोचल्या. या आंदोलनाची राज्य सरकारने दखल घेतली असून, अंगणवाडी सेविकांना दिलासा दिला आहे.**

### एसटी : सात तारखेला पगार

एसटी कर्मचाऱ्याचा पगार दर महिन्याच्या सात तारखेला होईल, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मुख्यमंत्री आणि सेवाशक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यामध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. एसटी कर्मचाऱ्याच्या पगारासाठी दर महिन्याच्या पाच तारखेआधी 320 कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारकडून परिवहन मंडळाला देण्यात येईल. या निधीमधूनच एसटी कर्मचाऱ्याचं प्रत्येक महिन्याचं वेतन त्या महिन्याच्या सात तारखेला करता येईल, असे यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान, अंगणवाडी सेविकांसोबत राज्य सरकारने सकारात्मक चर्चा केली आहे. अंगणवाडी सेविकांना दीड हजार रुपये मानधन वाढवून मिळणार असून, सेवा समाप्तीनंतर पेन्शन योजनाही सुरु केली जाणार आहे. तसेच त्यांना मोबाइल दिले जाणार आहेत. अंगणवाडी सेविकांच्या प्रश्नाबाबत तातडीची बैठक घेण्यात आली. सेविकांचे शिष्टमंडळ आणि मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यात मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने ही बैठक झाली. या बैठकीत तोडगा काढण्यात सरकारला यश आले आहे. दरम्यान, मागण्या पूर्ण होईपर्यंत मैदान सोडणार नसल्याचा पवित्रा अंगणवाडी सेविकांनी घेतला होता. राज्य सरकारनं साडेपाच, तर केंद्रानं गेली साडेचार वर्षे मानधनात कुठलीही वाढ दिलेली नाही. यासह अनेक मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका आक्रमक झाल्या होत्या. त्यानंतर हा प्रश्न विधानसभेतही उपस्थित करण्यात आला.



# होळी सणावर महागाईचा भस्मासूर

## पिचकारी, रंग, गुलालाच्या दरात 30 टक्क्यांनी वाढ



। चंद्रपूर । महाईन्यूज ।

**रंगांचा सण 'होळी'ला अवघे काही दिवस उरले आहेत. होळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील दुकानदारांनी आपापली दुकाने साहित्याने भरली आहेत. मात्र, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा रंग, पिचकारी, गुलाल आदींच्या किमती २० ते ३० टक्क्यांनी वाढल्या आहेत. त्यामुळे बाजारामध्ये खरेदीदारांचा निरुत्साह दिसून येत आहे.**

चंद्रपूर शहरातील गोल बाजारातील पिचकारी, रंग, गुलाल घाऊक विक्रेत्यांची दुकाने सजली आहेत. येथे होळीचे साहित्य नागपूर व दिल्लीतून येते. यंदाच्या उत्सवात चांगला व्यवसाय होईल या आशेने छोट्या व्यावसायिकांनी होळीचे सर्व सामान दुकानात भरले. मात्र, बाजारात खरेदीदारांमध्ये उत्साह दिसून आला नाही. माईक बूमप्रमाणे दिसणारी खास पिचकारी बाजारात दाखल झाली आहे. यावर्षी पहिल्यांदाच ही पिचकारी दाखल झाल्याने या पिचकारीला मोठी मागणी आहे.

याशिवाय पिचकरीचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत. लहानांपासून मोठ्यांना भुरळ घालतील अशा अनेक प्रकारच्या पिचकारी उपलब्ध आहेत. पिचकारीची किंमत २५ ते ५५० रुपयांपर्यंत आहे. होळीला आठवडा उरला असल्याने व्यवसायात सुधारणा होईल, असा विश्वास विक्रेत्यांनी व्यक्त केला आहे. लहान मुले आणि प्रौढांसाठी पिचकरीचे विविध प्रकार उपलब्ध असून त्यात बूम, बंदुकीसारखी पिचकारी, सेंच्युरी कलर थ्रोअर, रंगांपासून बचाव करणारे मुखवटे, टीव्ही रिपोर्टर्सनी वापरलेली टोपी, आदी विशेष आकर्षण आहे.

### हर्बल गुलालही बाजारात

बाजारात लाल, हिरवा, निळा, पिवळा गुलाल नेहमीच विकला जातो. यावेळी बाजारात नवीन रंगीत गुलाल उपलब्ध आहेत. जांभळे, केशरी, धानी आदी रंगीत गुलालही आले आहेत. आता ग्राहक नवीन रंगाच्या गुलालाची मागणी करत असल्याचे विक्रेते सांगतात. त्यांची मागणी लक्षात घेऊन नवीन रंगीत गुलाल मागविण्यात आला आहे. त्वचेला हानिकारक गुलाल अनेकजण टाळत आहेत. अशा लोकांसाठी हर्बल गुलालही बाजारात उपलब्ध आहे.

### महागाईमुळे गोड गाठी झाली कडू!

महाराष्ट्रात होळीचा रंग, गुलालाची उधळण केल्यावर लहान मुलांना साखरेपासून बनवलेली 'गाठी' देण्याची प्रथा आहे. विशेषतः होळीच्या दिवशी हे अधिक महत्त्वाचे असते. त्यामुळे गोलबाजारातील अनेक दुकानांमध्ये खरेदीदारांचे लक्ष वेधून घेणाऱ्या 'गाठ्या' उपलब्ध आहेत. मात्र, या गोड गाठ्यांवरही महागाईचा प्रभाव दिसून येत आहे.

# माजी आमदाराने लाल बावट्याची साथ सोडली, भाजपात जाहीर प्रवेश

। रायगड । महाईन्यूज ।

**शेकापचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी धैर्यशील पाटील यांचे कौतुक केले.**

धैर्यशील पाटील प्रत्येक गोष्टीचा सखोल अभ्यास करतात. मी मुख्यमंत्री असताना अनेक प्रश्न घेऊन माझ्याकडे ते आले होते जनतेत राहून जनतेची कामं करणे यासंदर्भातलं त्यांचे सातत्य महत्त्वाचं आहे. धैर्यशील पाटील भाजपात असले पाहिजेत असं आम्हाला वाटत होतं आणि त्यांचा प्रवेश झाल्याने आम्हाला आनंद होतो. भाजपने शेकापला मोठा धक्का दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

रायगड शेकापचा बालेकिल्ला आहे. भाजपचे ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत शेकापच्या बाळाराम पाटील यांचा पराभव केला. त्यातून सावरत असताना आता धैर्यशील पाटील यांनी भाजपात प्रवेश केला आहे. त्यामुळे शेकापला मोठा धक्का बसला आहे.



# याच आठवड्यात सत्तासंघर्षाचा फैसला!

## 8 महिन्यांपासून सुरु असलेला सत्तासंघर्ष लवकरच संपुष्टात येणार

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।



**आज सुनावणी दरम्यान सुप्रीम कोर्टाने महत्त्वाचे संकेत दिले आहेत. सत्तासंघर्षावरील सुनावणी याचं आठवड्यात संपणार आहे. अशी माहिती घटनापीठाकडून जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे ८ महिन्यांपासून सुरु असलेला संघर्ष लवकरच संपुष्टात येणार आहे.**

सुनावणी दरम्यान घटनापीठाने मोठी अपडेट दिली आहे. याच आठवड्यात हे प्रकरण संपवायचे आहे, असे महत्त्वपूर्ण वक्तव्य आज सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी सुनावणीदरम्यान केले. शिंदे गटाने परवापर्यंत आपला युक्तिवाद पूर्ण करावा, असे निर्देशही सरन्यायाधीशांनी दिले आहेत.

येत्या गुरुवारपर्यंत दोन्ही बाजूच्या वकिलांचा युक्तिवाद संपणार आहे. उद्या संध्याकाळपर्यंत शिंदे गटाचे वकील नीरज कौल आणि मनिंदर सिंग बाजू मांडतील. गुरुवारी दुपारी दोनपर्यंत सॉलिसिटर जनरल हरिष साळवी राज्यपालांच्या बाजूने युक्तिवाद करतील तर त्यानंतर शेवटचे दोन तास पुन्हा ठाकरे गटाचे वकील रिजॉइंडरसाठी बाजू मांडतील.यापूर्वी, राज्यातील सत्तासंघर्षाचा निकाल मार्चच्या पहिल्या आठवड्यात लागू शकतो, अशी महत्त्वाची माहिती ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी दिली होती.

### अभिषेक मनु सिंघवी यांचा युक्तिवाद

» महाराष्ट्रात अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना शिवसेनेकडून व्हीप जारी केला गेला. आमच्यावर कधीही अपात्रतेची कारवाई केली जाऊ शकते.

» राज्यपालांचा बहुमत चाचणीचा आदेश चुकीचा, 10 व्या सुचीतील अधिकारांचा गैरवापर करण्यात येत आहे.

»सरकार निवडून आल्यानंतर विश्वासमत प्रस्तावाबाबत राज्यपालांचे अधिकार काय?, असा सवाल न्यायमूर्तींनी अभिषेक सिंघवी यांना केली.

»त्यावर आमदारांच्या अपात्रतेवरील कारवाई प्रलबिंत असेल तर राज्यपाल विश्वासमत ठरावाबाबत निर्णय घेऊ शकत नाही, असे अभिषेक मनु सिंघवी यांनी सांगितले.

»अभिषेक मनु सिंघवी म्हणाले, राज्यपालांचे अधिकार काय? याबाबत तपासणी होणे आवश्यक आहे.

»राज्यपालांना सत्ताधारी पक्षात फूट दिसून आली तरीही त्यांनी निर्णय घ्यायचा नाही का?, असा सवाल न्यायमूर्तींनी केला. त्यावर पक्षाच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप करण्याचा अधिकार राज्यपालांना नाही. राज्यपाल ठोस कारणाशिवाय निर्णय घेऊ शकत नाही, असे अभिषेक मनु सिंघवी म्हणाले.

---

## विरोधक आक्रमक होताच CM शिंदेंच्या मदतीला धावले फडणवीस 'मविआ'ला दिलं ओपन चॅलेंज



।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्याचं अर्थसंकल्पीय विधिमंडळ अधिवेशन सुरू आहे. कालपासून राज्याच्या अर्थसंकल्पीय विधिमंडळ अधिवेशनाला सुरवात झालीये.

सध्या कांद्याचे दर नीचांकी पातळीवर आले असून राज्य आणि केंद्र सरकारकडून उपाययोजना होत नसल्याने कांद्याचे दर रोजच घसरत आहेत. दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला असून महाविकास आघाडीच्या आमदारांनी हा मुद्दा उचलून धरत विधीमंडळाच्या पायऱ्यांवर आज (मंगळवार) जोरदार आंदोलन केलं.

गळ्यात कांद्याच्या माळा घालून हे आमदार पायऱ्यांवर आंदोलन करताना दिसले. 'सरकार तुपाशी, शेतकरी उपाशी', 'मिळालाच पाहिजे... मिळालाच पाहिजे, शेतकऱ्याला भाव मिळालाच पाहिजे' 'गद्दार सरकार जोमात, शेतकरी मात्र कोमात' अशा घोषणा या आमदारांनी दिल्या. या आंदोलनात दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते अजित पवार आणि अंबादास दानवे सहभागी झाले होते.

दरम्यान, कांद्याच्या प्रश्नावर विरोध आक्रमक झाल्याचं पहायला मिळालं. सभागृहात कांद्याच्या दराविषयी प्रश्न उपस्थित करत काँग्रेस नेते नाना पटोले आणि राष्ट्रवादीचे आमदार छगन भुजबळ हे आक्रमक झाले.

# कांद्याच्या दरावरून विधान परिषदेत गदारोळ!

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंची सरकारवर टीका

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांत कांद्याचे दर कोसळले आहेत. यामुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. याच मुद्द्यावरून आज अर्थसंकल्पीय अधिवेशात विरोधी पक्ष आक्रमक झाला आहे. कांदा, द्राक्षे, हरभरा आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळाला पाहिजे, अशी मागणी विरोधी पक्षाने केली. यानंतर विधान परिषदेत गदारोळ झाला. परिणामी विधान परिषदेतील आजचं कामकाज तहकूब करण्यात आलं आहे.**

कांदा, द्राक्षे, कापूस आणि हरभरा उत्पादक शेतकऱ्यांची आताची महाराष्ट्रातील स्थिती अत्यंत वाईट आहे. एका कांदा उत्पादक शेतकऱ्याला २ रुपयांचा चेक देण्यात आला.तर एका कांदा उत्पादक शेतकऱ्याने ४ महिन्यांपूर्वी पंतप्रधान मोदींच्या जन्मदिनी आत्महत्या केली. सध्या कापसाला भाव मिळत नाहीये. १३-१४ हजार रुपये कापसाला भाव मिळत होता. हा दर आता ७ हजारांवर आला आहे.विरोधी पक्षनेते अंबादास दानवे पुढे म्हणाले, "केंद्र सरकारने ऑस्ट्रेलियामधून कापसाच्या गाठी आयात केल्या. हे सगळे प्रश्न घेऊन महाविकास आघाडीने २८९ च्या अंतर्गत चर्चा करण्याची मागणी केली. ही मागणी करताना आम्ही आमची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. पण भूमिका मांडायच्या आधीच देवेंद्र फडणवीसांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केला. २८९ अंतर्गत प्रस्ताव मांडणं हा विरोधीपक्षाचा हक्क असतो. याद्वारे जनतेचे प्रश्न मांडावे लागतात. मांडता येतात. पण हे सगळं न मांडता सरकारनेच उत्तर देण्याचा प्रयत्न केला."

"थोडक्यात शिंदे-फडणवीस सरकारला कांदा, कापूस, द्राक्षे,धान, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांबद्दल काहीही देणं-घेणं नाहीये. त्यामुळे यावर चर्चा करण्याची मागणी केली असताना ही चर्चा पूर्ण होऊ दिली नाही. आमचा प्रस्तावही मान्य केला नाही. प्रस्ताव मान्य न केल्याने आम्ही आमची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. पण यावेळी देवेंद्र फडणवीसांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केला, हे सगळं चुकीचं होतं. याचा अर्थ सरकार विरोधी पक्षाची गळचेपी करतंय.



### सरकार विरोधी पक्षाची गळचेपी करतंय

» "थोडक्यात शिंदे-फडणवीस सरकारला कांदा, कापूस, द्राक्षे,धान, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांबद्दल काहीही देणं-घेणं नाहीये. त्यामुळे यावर चर्चा करण्याची मागणी केली असताना ही चर्चा पूर्ण होऊ दिली नाही. आमचा प्रस्तावही मान्य केला नाही. प्रस्ताव मान्य न केल्याने आम्ही आमची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. पण यावेळी देवेंद्र फडणवीसांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केला, हे सगळं चुकीचं होतं. याचा अर्थ सरकार विरोधी पक्षाची गळचेपी करतंय. याचा आम्ही निषेध आम्ही केला आहे.

# 'यशस्वी पुरुषांच्या मागे धावण्यात अर्थ नसतो बाई! सोनानं कुणाचे टोचले कान?



टीव्ही मनोरंजन क्षेत्रातील त्या वादानं आता नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. पंजाबची कॅटरिना म्हणून जिच्या नावाचा उल्लेख केला जातो त्या शहनाज गिलचा चाहतावर्ग मोठा आहे. सोशल मीडियावर तिला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. बिग बॉसमध्ये सहभागी झालेल्या शहनाजच्या सौंदर्याचे चाहत्यांना नेहमीच कौतूक असते.


बॉलीवूडची प्रसिद्ध गायिका सोना महापात्रा ही तिच्या वेगवेगळ्या वक्तव्यांमुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. परखड वक्तव्यांसाठी ट्रोल होणाऱ्या सोनानं आता थेट शहनाजवर टीका केली आहे. जी तिच्या चाहत्यांना आवडलेली नाही. त्यामुळे चाहत्यांनी सोनाला चांगलेच सुनावले आहे. गेल्या काही दिवसांपासून सोना आणि शहनाज यांच्याबाबत वेगवेगळ्या चर्चा होताना दिसत आहे.बिग बॉसच्या तेराव्या सीझनमध्ये शहनाज गिलच्या परफॉर्मन्सने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढही झाली होती. चाहत्यांना शहनाजचा तो अंदाज प्रचंड भावला होता. आता सोना महापात्रानं शहनाजवर टीका केली आहे. त्यामध्ये तिनं तिच्यावर वैयक्तिक स्वरुपाचे आरोप केले आहेत.सोनानं काही दिवसांपूर्वी ट्विटरवरुन शहनाजवर टीका केली होती. अर्थात शहनाजच्या चाहत्यांनी सोनाचे ते बोलणे खटकले होते. त्यामुळे त्यांनी सोनावर चांगलीच आगपाखड केली होती. सोनानं आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, नवीन काही शिकण्यासाठी पैसे खर्च करा, एखादी गोष्ट जमत नसेल तर आणखी कष्ट करा. तुमच्यात जी चांगली गोष्ट आहे त्याच्यामागे धावत सुटा. त्याचा फॉलो अप घ्या.तुम्हाला माध्यम क्षेत्रांमध्ये काम करायचे आहे तर सतत प्रॅक्टिस करत राहा. तुम्ही यशस्वी पुरुषांमागे धावलात, लोकप्रियता मिळवण्यासाठी काहीही करु लागतात तर त्याचा काही उपयोग होत नाही. हे लक्षात ठेवा. तुमच्याजवळ टॅलेंट असण्याची गरज आहे. सोनानं व्यक्त केलेल्या या भावना शहनाजला उद्देशुन असल्याचे बोलले जात आहे.

# विराजसने वाढदिवशी पत्नीसाठी घेतला खास उखाणा

छोट्या पडद्यावरील 'माझा होशील ना' या मालिकेतून घराघरात पोहोचलेला अभिनेता म्हणून विराजस कुलकर्णी ओळखले जाते.

तो अभिनयाबरोबरच उत्तम दिग्दर्शक म्हणूनही ओळखला जातो. विराजस कुलकर्णीचा आज वाढदिवस आहे. यानिमित्ताने विराजसची पत्नी अभिनेत्री शिवानी रांगोळेने एक खा व्हिडीओ शेअर करत त्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

शिवानी रांगोळेने नुकतंच इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केला आहे. यात तिने त्या दोघांचा एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. यावेळी त्या दोघांनी मिळून एक उखाणा बोलताना दिसत आहे. यावेळी सुरुवातीला शिवानी म्हणाली, खास मेजवानीचा शेवट केला खाऊन स्ट्रॅाबेरी आईस्क्रीम आणि आईस्क्रीम केक, खास मेजवानीचा शेवट केला खाऊन स्ट्रॅाबेरी आईस्क्रीम आणि आईस्क्रीम केक, शिवानीचं नाव घेतो आमचं काहीच नाही फेक, असे म्हणत विराजसने तिचा उखाणा पूर्ण केला."विराजस कुलकर्णी तुला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. एकमेकांची वाक्य पूर्ण करण्यापासून ते एकमेकांच्या



जेवणाच्या थाळ्या संपवण्यापर्यंत...! अनाथेमा हे पहिले नाटक आणि व्हिक्टोरियाद्वारे दिग्दर्शनात केलेले पदार्पण. तुझ्या या प्रवासाचा एक भाग बनल्याबद्दल खूप आनंद आहे. हे तुझं वर्ष आहे. उत्तम राहा", असे कॅप्शन त्याने या व्हिडीओला दिले आहे.

या व्हिडीओत शिवानी ही विराजसकडे पाहत उखाणा घेताना दिसत आहे. त्यानंतर विराजसने हा उखाणा पूर्ण केल्यानंतर शिवानी ही लाजत हसताना दिसत आहे. त्या दोघांचा हा व्हिडीओ सध्या व्हायरल होताना दिसत आहे.

दरम्यान शिवानी रांगोळे ही लवकरच एका नव्या मालिकेत झळकणार आहे. झी मराठी वाहिनीवर लवकरच 'तुला शिकवीन चांगलाच धडा' ही मालिका प्रसारित होणार आहे. तर विराजस हा 'सुभेदार' या चित्रपटात झळकणार आहे. त्याच्या या चित्रपटातील भूमिकेबद्दल जाणून घेण्यासाठी अनेकजण उत्सुक आहेत.

# शेवटी क्रितीनं सांगितलं तिच्या बॉयफ्रेंडचं




अभिनेत्री क्रिती सेननचा 'शहजादा' नुकताच रिलिज झाला मात्र बॉक्स ऑफिसवर फारशी कमाल नाही. मात्र प्रेक्षकांना तिची आणि जोडी फार आवडली. पण सध्या व्यतिरिक्त क्रिती सेनन सुपरस्टार प्रभाससोबतच्या नात्यामुळे देखील चर्चेत आहे. अलीकडेच प्रभास आणि क्रितीच्या एंगेजमेंटची बातमी समोर आली होती. या दोघांची मालदीवमध्ये एंगेजमेंट होऊ शकते, असा दावाही रिपोर्ट्समध्ये करण्यात आला आहे. नंतर प्रभास आणि क्रितीच्या टीमने ही केवळ अफवा असल्याचं म्हटलं आणि सर्वांची बोलती बंद केली. क्रिती सेननने अलीकडेच तिच्या प्रियकराचं नाव सोशल मीडिया पोस्टद्वारे उघड केले. त्याच झालं असं की सोमवारी क्रितीने तिच्या चाहत्यांसोबत 'आस्क मी' सेशन केलं. यावेळी चाहत्यांनी अभिनेत्रीला अनेक प्रकारचे प्रश्न विचारले.तर तिथे एका चाहत्याने तिला थेट तिच्या बॉयफ्रेंडच नाव विचारलं. यावर क्रितीने प्रतिक्रिया देताना एक व्हिडिओ पोस्ट केला आणि म्हटले, "हे एक रहस्य आहे... अगदी माझ्यासाठीही." हे उत्तर दिल्यानंतर क्रितीही जोरजोरात हसायला लागली.

हा चित्रपट हा चित्रपट करु शकला कार्तिकची 'शहजादा' साऊथचा तिच्या

# 'बेशरम रंग' गाण्यावरील वादावर बोलली दीपिका

शाहरुख खानचा बहुचर्चित 'पठाण' चित्रपट बॉक्स ऑफिसवर १००० कोटींचा व्यवसाय करून सुपरहिट ठरला. या चित्रपटातील पहिलं गाणं 'बेशरम रंग' प्रदर्शित झाल्यानंतर चांगलाच वाद झाला होता. हा वाद अभिनेत्री दीपिका पदुकोणच्या भगव्या बिकिनीवरून झाला होता. पण, चित्रपटातील कोणत्याच कलाकाराने या वादावर प्रतिक्रिया दिली नव्हती. पहिल्यांदाच दीपिकाने या वादावर मौन सोडलं आहे. दीपिकाने गाण्याच्या वादादरम्यानचा अनुभव सांगितला. ती म्हणाली, "मी आम्हा दोघांसाठी (ती व शाहरुख) हे सांगू शकते की आम्हाला दुसरा कोणताही मार्ग माहीत नव्हता. मला वाटतं की आम्ही जसे माणूस म्हणून आहोत आणि ज्या पद्धतीने आमच्या कुटुंबांनी आमचं पालनपोषण केलं होतं, तसेच आहोत. आम्ही फक्त स्वप्नं आणि आकांक्षा घेऊन इथं मुंबईत एकटे आलो आहोत. आम्हाला फक्त वचनबद्धता, कठोर परिश्रम आणि नम्रता माहीत आहे आणि यामुळे आम्ही जिथे आहोत तिथे पोहोचलो आहोत."





# न्यूझीलंडने रचला इतिहास!

## 146 वर्षांनी इंग्लंडचा लाजिरवाणा पराभव

।वेलिंग्टन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**न्यूझीलंडने दुसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा शानदार पराभव करून इतिहास रचला आहे. त्याचबरोबर इंग्लंडचा १४६ वर्षांच्या कसोटी क्रिकेटमधील हा सर्वात लाजिरवाणा पराभव आहे. दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना वेलिंग्टन येथे खेळला गेला, ज्यामध्ये यजमानांनी इंग्लिश संघाचा फक्त एका धावेनी पराभव केला. तसेच मालिकेत १-१ अशी बरोबरीत साधली.**



न्यूझीलंडने इंग्लंडसमोर विजयासाठी २५८ धावांचे लक्ष्य ठेवले होते, परंतु त्यांच्या दुसऱ्या डावात संपूर्ण इंग्लिश संघ २५६ धावांवर गारद झाला. इंग्लंडकडून जो रूटने सर्वाधिक ९५ धावांची खेळी केला, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. त्याच वेळी, न्यूझीलंडच्या विजयाचे नायक नील वॅगनर आणि टीम साऊथी ठरले. ज्यांनी अनुक्रमे ४ आणि ३ विकेट घेतल्या.

यानंतर न्यूझीलंडचा पहिला डाव २०९ धावांत गुंडाळला गेला आणि इथे बेन स्टोक्सने दुसरी आणि सर्वात मोठी चूक केली. २२६ धावांची आघाडी घेऊन स्टोक्सने न्यूझीलंडला फॉलोऑन देण्याचा निर्णय घेतला.

### 1 धावेनी विजय मिळवणारा दुसरा संघ

»टीम साऊथीच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघाने दुसऱ्या कसोटीत इंग्लंडचा १ धावेनी पराभव करून इतिहास रचला. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात कमी धावांनी सामना जिंकणारा न्यूझीलंड हा जगातील दुसरा संघ ठरला आहे. यापूर्वी १९९३ मध्ये अॅडलेडमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध १ धावेने विजय मिळवून वेस्ट इंडिजने हा विक्रम केला होता, तब्बल ३० वर्षांनंतर न्यूझीलंडने इंग्लंडवर ऐतिहासिक विजय नोंदवून या यादीत आपले नाव नोंदवले आहे.

### फॉलोऑन देऊन इंग्लंड प्रथमच कसोटी सामना हरला

» इंग्लंडच्या कसोटी क्रिकेटच्या १४६ वर्षांच्या इतिहासात प्रथमच संघाला फॉलोऑन करून पराभव पत्करावा लागला. या सामन्यात इंग्लंडने आपला पहिला डाव ८ विकेट गमावून ४३५ धावांवर घोषित केला. पाहुण्या संघाला येथे ५००-६०० धावा करण्याची मोठी संधी होती. कारण जो रूट १५३ धावा केल्यानंतर क्रीजवर उपस्थित होता. मात्र स्टोक्सच्या आक्रमक विचारसरणीमुळे इंग्लंडने आपला पहिला डाव खूप लवकर घोषित केला.

# सचिन तेंडुलकरचा भव्य पुतळा उभारून MCA देणार सर्वात मोठं गिफ्ट!

## » वानखेडेत तयारी पाहून क्रिकेटचा देव भावुक

।मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतासाठी खेळताना ज्या मैदानात यशाची अनेक शिखरे जिथे पादाक्रांत केली अशा वानखेडे स्टेडियममध्ये आता क्रिकेटच्या देवाचा एक भव्य दिव्य पुतळा बसवला जाणार आहे. क्रिकेटमधून सचिनने निवृत्ती घेतल्यानंतर १० वर्षांनी हा निर्णय घेण्यात आला आहे. 24 एप्रिलला, तेंडुलकरच्या 50व्या वाढदिवसाला किंवा वर्षाच्या अखेरीस ५० षटकांच्या विश्वचषकादरम्यान या पुतळ्याचे अनावरण केले जाईल, अशी माहिती सध्या समोर येत आहे. आज, वानखेडे स्टेडियमवर सचिन तेंडुलकर आणि एमसीएचे अध्यक्ष अमोल काळे, पुतळा कुठे ठेवायचा हे पाहण्यासाठी पोहोचले होते.**



मुंबई क्रिकेट असोसिएशनचे (एमसीए) अध्यक्ष अमोल काळे यांनी इंडियन एक्स्प्रेसला सांगितले की, "वानखेडे स्टेडियममधील हा पहिला पुतळा असेल, तो कुठे ठेवायचा हे लवकरच ठरवू. तेंडुलकर भारतरत्न आहे आणि त्याने क्रिकेटसाठी काय केले हे सर्वांना माहीत आहे. त्याच्या ५०व्या वाढदिवशी हे MCA कडून एक लहान गिफ्ट असेल. तीन आठवड्यांपूर्वीच सचिनने यासाठी परवानगी दिली आहे.

"वानखेडे स्टेडियममध्ये सध्या सचिनचे नाव असलेले स्टँड आहे. एमसीएने भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांना कॉर्पोरेट बॉक्स आणि फलंदाजीतील दिग्गज दिलीप वेंगसरकर यांच्या नावाचा स्टँड उभारून त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला होत. देशात क्रिकेटपटूंचे पुतळे स्टेडियममध्ये नाहीत. विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, आंध्रमधील व्हीडीसीए स्टेडियम आणि इंदूरमधील होळकर स्टेडियममध्ये भारताचे माजी महान फलंदाज सी के नायडू यांचे असे तीन स्वतंत्र पुतळे आहेत.

मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर दिवंगत शेन वॉर्नचा क्रिकेटपटूंचा सर्वात प्रसिद्ध पुतळा आहे. २०११ मध्ये वॉर्नने अनावरण करताना म्हटले होते, "हा एक मोठा सन्मान आहे, स्वतःला तिथे पाहणे थोडे विचित्र आहे पण मला खूप अभिमान आहे." हा पुतळा 300 किलोचा आहे! आता भारतातही सचिन तेंडुलकरसाठी असाच भव्य दिव्य पुतळा उभारण्यात येत आहे.

# मेस्सीने जिंकला FIFA सर्वोत्कृष्ट खेळाडूचा किताब!

## रोनाल्डोच्या विक्रमाची केली बरोबरी

। पंजाब । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



अर्जेंटिनाच्या फुटबॉल संघाचा स्टार आणि अनुभवी फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीला पॅरिसमध्ये 2022 सालचा फिफा प्लेयर ऑफ द इयरचा किताब देण्यात आला आहे. महिला गटात सलग दुसऱ्या वर्षी हा पुरस्कार स्पॅनिश खेळाडू अलेक्सिया पुटेलसला देण्यात आला.

प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर लिओनेल मेस्सीने पहिला फिफा विश्वचषक जिंकला. ज्याचे आयोजन कतारमध्ये करण्यात आले होते. फ्रान्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात मेस्सीनेदोन महत्त्वाचे गोल केले होते. अंतिम सामना जिंकून अर्जेंटिनाने तब्बल 36 वर्षांनंतर विश्वचषकाची सुवर्ण ट्रॉफी जिंकली.

लिओनेल मेस्सी व्यतिरिक्त अर्जेंटिनाला विश्वचषक जिंकून देणारे त्याचे प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांची फिफाच्या 2022 वर्षातील सर्वोत्तम प्रशिक्षकासाठी निवड करण्यात आली आहे. एवढेच नाही तर अर्जेंटिनाला विश्वचषक जिंकून देण्यात त्याचा कीपर एसी मार्टिनेझने महत्त्वाची भूमिका बजावली. ज्यासाठी त्याला FIFA गोलकीपर ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.लिओनेल मेस्सीने दुसऱ्यांदा हा पुरस्कार पटकावला आहे. यासह त्याने पोर्तुगालचा दिग्गज ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि पोलंडचा रॉबर्ट लेवांडोस्की यांच्या विक्रमाची बरोबरी केली आहे, ज्यांनी दोनदा कब्जा केला. पीएसजी क्लबकडून खेळणाऱ्या मेस्सीला यापूर्वी 2019 मध्ये या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. रोनाल्डोने 2016 आणि 2017 मध्ये सलग दोन वर्षे हा पुरस्कार जिंकला. तर लेवांडोव्स्कीने 2020 आणि 2021 मध्ये ते ताब्यात घेतले.